नि.फौ.ख.क्र. २३९/२०२५
सरकार-वि- पंढरी
निशाणी क्र. १३



**<u>अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०१ सचिन गोवर्धन आठवले यांचा सरतपास सरकारतर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्री. टी. एस. आरगे यांच्यामार्फत शपथेवर सुरू.</u>**

**२.** मला जप्त मुद्देमाल दाखवल्यास मी ओळखू शकतो. मला बोरीचे लाकूड दाखवण्यात आले. ते तेच आहे. त्यास **एम.ओ. क्र. १** देण्यात येते. मला सागवन खुंटया दाखवण्यात आल्या. त्या त्याच आहेत. त्यास एकत्रीत **एम.ओ. क्र. २** देण्यात येते. मला एक तारेचे बंडल दाखवण्यात आले. ते तेच आहे. त्यास **एम.ओ. क्र. ३** देण्यात येते. मला बांबूची काठी दाखवण्यात आली. ती तीच आहे. त्यास **एम.ओ. क्र. ४** देण्यात येते. वन रक्षक शेलार यांनी त्यांच्या मोबाईलमध्ये मृत वाघाचे फोटो काढले आहे.

**३.** पशू वैद्यकीय अधिकारी, वन्यजीव प्रतिपालक (वाईल्ड लाईफ वार्डन) यांचे प्रतिनिधी व नागपूर वन विभागाचे उप वनसंरक्षक व सहाय्यक वन संरक्षक यांच्यासमक्ष वाघाचे मोक्यावर शवविच्छेदन करण्यात आले. त्याप्रमाणे शवविच्छेदन पंचनामा केला. त्यावर माझी, पंचांची, वर्तुळ अधिकारी, पशू वैद्यकीय अधिकारी यांच्या सहया आहेत. तेथे हजर असलेल्या अधिका-यांच्या सहया आहेत. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र. १५** देण्यात येते. वाघाचे महत्वाचे अवयव फॉरेनसिक लॅब येथे पाठवले. त्याबाबत पशू वैद्यकीय तज्ञ यांना विसेरा दिल्याबाबतचे पत्र दिले. ते पत्र मला दाखविण्यात आले. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र. १६** देण्यात येते. त्याप्रमाणे शवविच्छेदानाचा अहवाल पाठविण्याबाबत पत्र दिले. ते पत्र मला दाखविण्यात आले. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र. १७** देण्यात येते. राहिलेल्या अवयवांचे जागेवर दहन करण्यात आले. त्याप्रमाणे दहन पंचनामा केला. घटनास्थळापासून ५०० मिटरच्या परिसरात ४ टिम करून वेगळया दिशेने पाठवल्या व त्याप्रमाणे ४ पंचनामे केले.

**४.** स्थानिक लोकांकडून चौकशी केली. राजू दससामा, मानिक सिलू, वसंता बन आणि संजय सिलू यांचे नाव चौकशीमध्ये निष्पन्न झाले. त्याप्रमाणे आम्ही तोरणी, ता.

बिछवा, जि. छिंदवाडा येथे निघालो. बिछवा पोलिस स्टेशन व स्थानिक लोकांच्या सहाय्याने पुढील तपास केला. खमारपानी पोलिस चौकी येथे आलो. होळीच्या सन असल्याने आम्ही खमारपानी पोलिस चौकीमध्ये थांबलो. दि. १५.०३.२०२५ रोजी तपासात झालेल्या प्रगतीबाबत पंचनामा केला. मला तो पंचनामा दखविण्यात आला. त्यावर माझी व पंचांची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र. १८** देण्यात येते. दि. १६.०३.२०२५ रोजी खमारपानी गावामध्ये तोरणी गावात गेलो. राजू दरसमा व मानिक सिलू हे गावामध्ये दिसल्याने आम्ही त्यांना ताब्यात घेतले. त्यांच्या घराची झडती घेतली. संजय सिलू व वसंता बन हे फरार झाले. आरोपींच्या नातेवाईकांना सूचना दिली व त्यांना घेवून खापा येथे वन परिक्षेत्र कार्यालयात नेले. दि. १६.०३.२०२५ रोजीच्या तपास कार्याचा पंचनामा केला. तो पंचनामा मला दाखविण्यात आला. त्यावर माझी व पंचांची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र. १९** देण्यात येते. त्यानंतर आम्हाला गुप्तहेराकडून माहिती मिळाली की, पंढरी कुंभरे रा. सोनपूर, ता. सावनेर, जि. नागपूर यांचा सदरचा वन गुन्हयामध्ये सक्रिय सहभाग आहे. त्यावरून रात्री १२.०० वाजताच्या दरम्यान त्याला अटक करण्यात आले. त्याच्या अटक पंचनपामा तयार करण्यात आला. नंदू भलावी, छेदीराम ठाकूर व किशोर भलावी यांना अटक केली. त्यांच्या नातेवाईकांना सूचनापत्र दिले. मला ४ सूचनापत्र दाखविण्यात आले. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास अनु. **निशाणी क्र. २० ते २३** देण्यात येते. सहाय्यक वन रक्षक अधिकारी यांनी आरोपींचे बयाण नोंदविले. पंढरी कुंभरे याने दि. ०२.०३.२०२५ ते १३.०३.२०२५ पर्यंत विद्यृत तारेवर आकोडे टाकून विविध शिकार केल्याबाबत मान्य केले. त्याने सदरची जागा दाखविली. त्याबाबत मेमोरंडम पंचनामा तयार करण्यात आला. मला मेमोरंडम पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी, वर्तुळ अधिकारी व पंचांची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र. २४** देण्यात येते. त्याने जी जागा दाखविली ती जागा गजानन पाटील रा. सोनपूर यांचे शेत होते.

त्यावरून ११ के. वी. विद्युत लाईन गेली आहे. ज्या तारेच्या सहाय्याने शिकार केली त्याचे तीन तारेचे बंडल, सागवन लाकडी खुंटया, जर्मन घमिले दाखवले. पंढरी कुंभरेच्या घरातून त्याने एक कु-हाड व एक सुरी काढून दिली. ती मला दाखविण्यात आली. ती तीच आहे. कु-हाड ला **एम. ओ. क्र. ५** व सुरीला **एम. ओ. क्र. ६** देण्यात येते. मी जप्ती पंचनाम्याच्या वेळी घटनास्थळावर हजर होतो. मी जप्त मुद्देमाल पाहिल्यास ओळखू शकतो. मला जर्मन घमिले दाखवण्यात आले. ते तेच आहे. त्यास **एम. ओ. क्र. ७** देण्यात येते. मला तीन तारेचे बंडल दाखविण्यात आले. ते तेच आहे. त्यास एकत्रीत **एम. ओ. क्र. ८** देण्यात येते. मला प्लास्टीक कोटेट काळी वायर दाखविण्यात आली. ती तीच आहे. त्यास **एम. ओ. क्र. ९** देण्यात येते. ५.५ मिटर बांबूची काठी दाखविल्यास मी ओळखू शकतो. आरोपी किशोर भलावी, नंदू भलावी व छेदिलाल ठाकूर यांचा कबूली जबाब नोंदविला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र. २५** देण्यात येते. त्यानुसार मेमोरंडम पंचनामा तयार केला. तो मला दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र. २६** देण्यात येते. त्यानंतर नंदू भलावी, रा. सोनपूर यांच्या घरी गेलो.

**५.** नंदू भलावी याने सांगितले की, पंढरी कुंभरे हा गजानन पाटील, रा. सोनपूर यांच्या शेतामध्ये ११ के.वी. विद्युत ताराच्या सहाय्याने आकोडा लावून शिकार करत होते. त्याची माहिती मला व उत्तम मैश्राम यांना देत होता. उत्तम मैश्राम हा माझ्या घरा भाडेकरू म्हणून राहत होता. आम्ही दोघे पंढरी कुंभरे याला झालेल्या शिकारीचे मास विक्री करण्यास मदत करत होतो. तसेच मास वाहतूकीकरिता किशोर भलावी यांच्याकडील मोटर सायकलचा वाहतूकीकरिता मदत घेत होतो. किशोर भलावी याला गाडी वापरण्याचा मोबदला म्हणून वन्य प्राण्याचे मास व पेट्रोल टाकून देत होतो. शिल्लक राहिलेल्या मासाचे संगणमताने नंदू भलावी यांच्या घरी भाजी करून खात होतो. नंदू भलावी यांच्या घरून मास कापाची सुरी व चाकू जप्त करण्यात आले. ते मला दाखवण्यात आले. ते तेच आहे. त्यास

**नि.फौ.ख.क्र. २३९/२०२५**
**सरकार-वि- पंढरी**
**निशाणी क्र. १३**



अनु. **एम. ओ. क्र.१०** व **११** देण्यात येते. माझ्या समक्ष जप्ती पंचनामा तयार केला. जप्त मुद्देमालाचा तपशील अनावीधानाने राहून गेला.

**न्यायालयाची वेळ संपल्याने सरतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब.**

श्रवणोत्तर स्वीकृत
समक्ष

SONPARI MAHENDRA GADE
Digitally signed by SONPARI MAHENDRA GADE
Date: 2025.09.10 17:16:25 +0530

(एस. एम. गाडे)
**न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,**
(न्यायालय क्र.०३) सावनेर

सावनेर,
दिनांक १०.०९.२०२५

नि.फौ.ख.क्र. २३९/२०२५
सरकार-वि- पंढरी
निशाणी क्र. १३

**C E R T I F I C A T E**

I affirm that the contents of this PDF evidence are same word to word, as per the original evidence.

Name of Stenographer :- D. R. Aglawe